# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १५६** **दिनांक १२/०६/२०२१**

## यापुर्वी मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय हद्दिद लागु केलेल्या मनाई आदेशाचे निबंर्धांमध्ये शिथिलता

कोरोना विषाणु संसर्गाचा कमी झालेला प्रादुर्भाव लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने नोटीफिकेशन क्रं. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्ती व्यवस्थापन -१ दिनांक ०४/०६/२०२१, अन्वये आदेश लागु केलेला असून राज्यात यापुर्वी लागु केलेल्या मनाई आदेशातील निबंर्धांमध्ये शिथिलता दिली आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे व जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांनी देखील दि ११/०६/२०२१ रोजी नवीन आदेश लागू केलेले आहेत. सदर दोन्ही आदेशास अनुसरुन श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), यांनी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्रिदकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ प्रमाणे जनतेस व आस्थापना यांना उद्देशुन नवीन आदेश काढलेले आहेत.

**महाराष्ट्र शासन व मा. जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचे दि ११/०६/२०२१ चे आदेशास अनुसरुन मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता शिथीलता नियम खालील प्रमाणे असतील.**

१. सर्व अत्यावश्यक सेवांची दुकाने सायं. १६.०० वाजे पर्यंत सुरु राहतील.
२. अत्यावश्यक सेवेशी निगडीत नसणाऱ्या आस्थापना व दुकाने सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पर्यंत व आठवडया अंती (शनिवार व रविवार) अशी दुकाने बंद राहतील.
३. मॉल/सिनेमागृहे/ नाटयगृहे आठवडयातील सर्व दिवस बंद राहतील.
४. उपहारगृहे/ हॉटेल्स्/रेस्टॉरंन्ट हे सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पर्यंत हॉटेलच्या बैठकीच्या क्षमतेच्या ५० टक्के क्षमते एवढया ग्राहकांना जेवता येईल या प्रमाणात सुरु राहतील व आठवडया अंती (शनिवार व रविवार) केवळ पार्सल/टेक अवे आणि होम डिलेवरी सुविधा सुरू राहतील.
५. उपनगरीय लोकल वाहतूकीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.
६. सार्वजनिक ठिकाणे / खेळाची मैदाने / वॉकिंग ट्रॅक/ सायकलींग इत्यादींच्या वापरा करीता दररोज सकाळी ०५.०० वा. ते सकाळी ०९.०० वाजे पावेतो परवानगी असेल.
७. खाजगी कार्यालये हे सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पावेतो सुरु राहतील. (ज्या कार्यालयांना सुट देण्यात आलेली आहे ती खाजगी कार्यालये वगळुन)
८. कार्यालयीन उपस्थिती शासकीय तथा खाजगी (सुट देण्यात आलेली) कार्यालये ही ५० टक्के क्षमते एवढी असावी.
९. क्रिडा-सकाळी ०५.००वा. पासुन सकाळी ०९.०० वा. पर्यंत फक्त मैदानी खेळांना परवानगी राहील.
१०. चित्रीकरण Bubble च्या आतमध्ये सायं.०४.०० वा पर्यंत सुरु ठेवता येईल व सायं. ०५.०० वा. नंतर कोणासही हालचाल करता येणार नाही.

११. सामाजिक मेळावे व सांस्कृतीक कार्यक्रम हे सभागृहाच्या ५० टक्के क्षमतेने सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पर्यंत भरविता येतील.

१२. विवाह समारंभ ५० लोकांच्या उपस्थितीत करण्याची मूभा असेल.

१३. अंत्यविधी २० लोकांच्या उपस्थितीत करण्याची मूभा असेल.

१४. निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक संस्थाच्या / सहकारी संस्थांच्या बैठका ५० टक्के क्षमते इतक्याच उपस्थितीत घेता येतील.

१५. बांधकामाच्या ठिकाणी मजुरांच्या निवासस्थानाची सोय असलेली बांधकामे सुरु राहतील किंवा इतर ठिकाणांहून बांधकामासाठी येणाऱ्या मजुरांना सायं. १६.०० वाजे पर्यंत सोडणे बंधनकारक असेल.

१६. कृषि सेवा दुकाने परवानगी दिलेल्या वेळेत सुरु राहतील.

१७. ई-कॉमर्स सुविधांशी निगडीत सेवा पुर्ण वेळ सुरु राहतील.

१८. दररोज सायं. १७.०० वाजे पर्यंत जमाव बंदी असेल व सायं. १७.०० वाजे नंतर संचार बंदी असेल.

१९. व्यायाम शाळा/ सलुन/ ब्युटी पार्लर /स्पा /वेलनेस सेंटर दररोज सायं. १६.०० वाजे पर्यंत ५० टक्के एवढया क्षमतेने सुरु राहतील. परंतु ग्राहकांना पुर्वनियोजित वेळ ठरवुनच यावे लागेल. तसेच वातानुकूलन यंत्रणेचा वापर करता येणार नाही.

२०. प्रवासी वाहतुक करणाऱ्या बसेस आसन क्षमतेच्या १०० टक्के क्षमतेने सुरु राहतील. परंतु प्रवाशांना उभे राहुन प्रवास करता येणार नाही.

२१. माल वाहतुक सेवा जास्तीत जास्त ०३ प्रवाशांसह ( चालक, मदतनीस व क्लिनर) यापुर्वी शासनाने घातलेल्या निर्बंधासह सुरु राहतील.

२२. आंतरजिल्हा प्रवासाठी खाजगी कार/ टॅक्सी/ बसेस/ लांब पल्ल्याच्या रेल्वे याव्दारे स्तर ५ मधील घटकातुन प्रवास करतांना तसेच स्तर ५ मधील घटकात थांबा घेऊन जात असल्यास अशा प्रवाश्यांना ई-पास घेणे बंधनकारक राहिल.

२३. उत्पादन क्षेत्रातील निर्यात क्षेत्राशी निगडीत घटक लघु व मध्यम उद्योग अंतर्भूत करुन जे निर्यातीशी निगडीत सर्व अटी शर्तीचे पालन करुन पुर्ण क्षमतेने सुरु राहतील.

२४. उत्पादनाच्या अनुषंगाने:-

१. अत्यावश्यक वस्तुंचे उत्पादन करणारे युनिट (आवश्यक वस्तु आणि कच्चे माल/पॅकेजिंग चे उत्पादन करणारे घटक म्हणुन वर्गीकृत केलेल्या वस्तु व आवश्यक असलेल्या पुरवठयाच्या साखळीसह)

२. सर्व सतत प्रक्रिया सुरु असणारे उद्योग(ज्या युनिट्साठी अशा प्रकारच्या प्रक्रियेचे आवश्यकता असते,ज्या अशा प्रकारच्या स्वरुपाच्या असतात ज्यांना त्वरीत थांबवता येत नाही आणि पुरेशा वेळेशिवाय ते पुन्हा सुरु होवु शकत नाही.)

३. राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी महत्वपुर्ण असलेल्या वस्तुंचे उत्पादन.

४. अत्यावश्यक,गंभीर स्वरुपाच्या पायाभुत सेवा,सुविधा देणारे डेटा सेंटर/ क्लाऊड सेवा देणारे प्रदाता /आयटी सेवा नियमीत सुरु राहतील.

२५. उत्पादन सेक्टर मधील इतर सर्व उत्पादन युनिट, जे अत्यावश्यक सेवेत समाविष्ट केलेले नाहीत, परंतु निरंतर चालु ठेवणे आवश्यक आहेत, असे युनिट केवळ ५० टक्के कर्मचारी क्षमतेने सुरु राहतील.

**सदरचा मनाई आदेश हा मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्राकरिता दिनांक १४/०६/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वाजे पासून दिनांक २१/०६/२०२१ रोजीच्या सकाळी ०७.०० वाजे पावेतो लागू राहिल.**

**महाराष्ट्र शासन व मा. जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांचे दि ११/०६/२०२१ चे आदेशास अनुसरून वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता खालील प्रमाणे निर्बंधामध्ये शिथीलता देण्यात येत आहेत.**

१. अत्यावश्यक सेवेशी निगडीत आस्थापना व दुकाने हे नियमीत सुरू राहतील.
२. अत्यावश्यक सेवेशी निगडीत नसणाऱ्या आस्थापना व दुकाने नियमीत सुरु राहतील.
३. मॉल/सिनेमागृहे/ नाटयगृहे ही ५० टक्के क्षमतेने सुरु राहतील.
४. उपहारगृहे/ हॉटेल्स्/रेस्टॉरंन्ट हे हॉटेलच्या बैठकीच्या क्षमतेच्या ५० टक्के क्षमते एवढया ग्राहकांना जेवता येईल या प्रमाणात सुरू राहतील.
५. उपनगरीय लोकल वाहतूकीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.
६. सार्वजनिक ठिकाणे / खेळाची मैदाने / वॉकिंग ट्रॅक/ सायकलींग इत्यादींच्या वापरा करीता नियमीत सुरु राहतील.
७. खाजगी कार्यालये हे नियमीत सुरू राहतील.
८. कार्यालयीन उपस्थिती शासकीय तथा खाजगी (सुट देण्यात आलेली) कार्यालये ही १०० टक्के क्षमते एवढी असावी.
९. क्रिडा- INDOOR GAMES सकाळी ०५.००वा. पासुन ते सकाळी ०९.०० वा.पर्यंत व सायं. १७.०० वा. पासुन ते रात्रौ.२१.०० वा.पर्यंत सर्व दिवस परवानगी राहील. तसेच OUTDOOR GAMES सर्व दिवशी सुरु राहतील.
१०. चित्रीकरण नियमीत सुरु राहील.
११. सामाजिक मेळावे व सांस्कृतीक कार्यक्रम हे सभागृहाच्या ५० टक्के क्षमतेने सोमवार ते शुक्रवार सायं. १६.०० वाजे पर्यंत भरविता येतील.
१२. विवाह समारंभ हॉलच्या क्षमतेच्या ५० टक्के तथा १०० लोकांच्या उपस्थितीत करण्याची मूभा असेल.
१३. अंत्यविधीस जास्तीत जास्त ५० व्यक्तींना उपस्थित राहण्यास मूभा असेल.
१४. निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक संस्थाच्या / सहकारी संस्थांच्या बैठका ५० टक्के क्षमते इतक्याच उपस्थितीत घेता येतील.
१५. बांधकामास नियमीत प्रमाणे मूभा असेल.
१६. कृषि विषयक विक्री करणारी दुकाने / आस्थापना नियमीत सुरु राहतील.
१७. ई-कॉमर्स सुविधांशी निगडीत सेवा पुर्ण वेळ सुरू राहतील.
१८. पुर्ण वेळ जमाव बंदी लागू असेल.
१९. व्यायाम शाळा/ सलुन/ ब्युटी पार्लर /स्पा /वेलनेस सेंटर ५० टक्के एवढया क्षमतेने सुरु राहतील. परंतु ग्राहकांना पुर्वनियोजित वेळ ठरवुनच यावे लागेल.
२०. प्रवासी वाहतुक करणाऱ्या बसेस आसन क्षमतेच्या १०० टक्के क्षमतेने सुरू राहतील. परंतु प्रवाशांना उभे राहुन प्रवास करता येणार नाही.
२१. माल वाहतुक नियमितपणे सुरू राहतील.
२२. आंतरजिल्हा प्रवासाठी खाजगी कार/ टॅक्सी/ बसेस/ लांब पल्ल्याच्या रेल्वे याव्दारे स्तर ५ मधील घटकातुन प्रवास करतांना तसेच स्तर ५ मधील घटकात थांबा घेऊन जात असल्यास अशा प्रवाश्यांना ई-पास घेणे बंधनकारक राहिल.
२३. उत्पादन घटक- निर्यातीशी संबंधित घटक निर्यात बंधन पूर्ण करण्याची आवश्यक असलेल्या MSMEs सह नियमितपणे सुरु राहतील.
२४. उत्पादनाच्या अनुषंगानेः-

५. अत्यावश्यक वस्तुंचे उत्पादन करणारे युनिट (आवश्यक वस्तु आणि कच्चे माल/पॅकेजिंग चे उत्पादन करणारे घटक म्हणुन वर्गीकृत केलेल्या वस्तु व आवश्यक असलेल्या पुरवठयाच्या साखळीसह)

६. सर्व सतत प्रक्रिया सुरु असणारे उद्योग(ज्या युनिट साठी अशा प्रकारच्या प्रक्रियेचे आवश्यकता असते,ज्या अशा प्रकारच्या स्वरुपाच्या असतात ज्यांना त्वरीत थांबवता येत नाही आणि पुरेशा वेळेशिवाय ते पुन्हा सुरु होवु शकत नाही.)

७. राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षणासाठी महत्वपुर्ण असलेल्या वस्तुंचे उत्पादन.

८. अत्यावश्यक,गंभीर स्वरुपाच्या पायाभुत सेवा,सुविधा देणारे डेटा सेंटर/क्लाऊड सेवा देणारे प्रदाता /आयटी सेवा नियमीत सुरु राहतील.

२५. उत्पादन सेक्टर मधील इतर सर्व उत्पादन युनिट, जे अत्यावश्यक सेवेत समाविष्ट केलेले नाहीत, परंतु निरंतर चालु ठेवणे आवश्यक आहेत, असे युनिट नियमीत क्षमतेने सुरु राहतील.

**सदरचे मनाई आदेश वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता दिनांक १४/०६/२०२१ पासून पुढील आदेश होईपर्यंत लागू राहिल.**